महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्रशासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेलाबॅटरीजविस्तारीतइमारत,तळमजला,प्लॉटनं.१,धारावीरोड,माटुंगा,मुंबई४०००१९
email : agmhrom@gmail.com website :www.mahadiscom.in
दुरध्वनीक्रमांक:०२२-२४०७७४४१ फॅक्सक्रमांक:०२२-२४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/ **२१६६६** दिनांक: **०८/१२/२०२०**

**प्रति,**
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
परिमंडळ कार्यालय (सर्व)

**विषय: विद्युत सहाय्यक यांना आय.टी.आय. प्रशिक्षण पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

**संदर्भ :**प्रशासकीय परिपत्रकक्र. ५५३ दि. २४.०३.२०१७.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५३ दि.२४.०३.२०१७ अन्वये प्रसृत करण्यात आलेल्या मुदतपूर्व सेवानिवृत्ती योजने अंतर्गत नमुद अटी व शर्ती नुसार नियुक्त केलेले जे विद्युत सहाय्यक, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील आय.टी.आय. (तारतंत्री/वीजतंत्री) / सी.ओ.ई. / दोन वर्षांची (विद्युत/तारतंत्री) पदविका ही अर्हता धारण करीत नाहीत अशा विद्युत सहाय्यकांनी प्रथम तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण होण्यापुर्वी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील आय.टी.आय. (तारतंत्री/वीजतंत्री) हा अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच सदर विद्युत सहाय्यक यांनी आय. टी.आय. ही शैक्षणिक अर्हता तीन वर्षाच्या कालावधीत प्राप्त न केलेस त्यांची कंत्राटी सेवा समाप्त करण्यात यावी असे नमूद केले आहे.

२. सध्या कोवीड - १९ च्या प्रादुर्भावामुळे विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम परीक्षा शासनाकडून आयोजीत करण्यात आलेल्या नाहीत. तसेच आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) अभ्यासक्रमाची परिक्षासुध्दा लांबणीवर गेलेली आहे. त्यामुळे संबंधीत विद्युत सहाय्यकांना ३ वर्षाच्या कंत्राटी कालावधी मध्ये शैक्षणिक अर्हता प्राप्त करता आली नाही.

३. वरील बाबी विचारात घेउन, या प्रकरणी सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) आय.टी.आय. अभ्यासक्रमाची परीक्षा लांबणीवर गेल्यामुळे जे 'विद्युत सहाय्यक' सदरची अर्हता प्राप्त करू शकलेले नाहीत अशा विद्युत सहाय्यकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची जी प्रथम परीक्षा आयोजीत करण्यात येईल त्याच्या निकालाच्या दिनांकापर्यंत सदरची शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

ब) तीन वर्षांचा कंत्राटी कालावधी पूर्ण झाल्यानंतर मुदतवाढ देण्यात आलेल्या कालावधीमध्ये संबंधित विद्युत सहाय्यक यांना कोणतेही मानधन अदा करण्यात येणार नाही. तथापि, आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची भविष्यात आयोजीत करण्यात येणारी प्रथम परीक्षा उत्तिर्ण झाल्यास संबंधित विद्युत सहाय्यकास वाढीव कालावधीचे मानधन अदा करण्यात यावे.

क) तीन वर्षांच्या कालावधीमध्ये आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) ही परीक्षा उत्तिर्ण न झाल्याबद्दल ज्या विद्युत सहाय्यकांचा कंत्राटी कालावधी समाप्त करण्यात आलेला आहे, असे विद्युत सहाय्यक आय.टी.आय. (तारतंत्री/विजतंत्री) या अभ्यासक्रमाची भविष्यात आयोजीत करण्यात येणारी प्रथम परीक्षा उत्तिर्ण झाल्यास त्यांना विद्युत सहाय्यक पदावर पुन:श्च नियुक्ती देण्यात यावी.

४. सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, वरील सूचना विचारात घेउन अर्हतारहीत विद्युत सहाय्यक यांच्या कंत्राटी कालावधीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.५५३ दि. २४.०३.२०१७ मधील इतर अटी व शर्ती अपरिवर्तीत राहतील.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिकसंचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

**प्रत सस्नेहसादर :**
१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.